# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## विद्यापीठाची पेट -२०१७, परिक्षा दि. १४ व १५जुलै, २०१७ रोजी

औरंगाबाद डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठतर्फे घेण्यात येणारी ४ थी पेट -२०१७ ही परीक्षा दि. १४ व १५ जुलै, शुक्रवार व शनिवार, २०१७ रोजी चारही जिल्हयाच्या परिक्षेत्रात घेण्यात येणार आहे. या परिक्षेसाठी विविध विद्या शाखामधुन १४५०० एवढे विद्यार्थी पेट परिक्षा देत आहेत, यासाठी औरंगाबाद, जालना, बीड व उस्मानाबाद जिल्हयातील विविध महाविद्यालयामध्ये पेट २०१७ साठी परिक्षा केंद्र म्हणून अनेक महाविद्यालये निवडण्यात आली आहेत. ०१ जुलै, २०१७ रोजी सर्व पात्र व अपात्र विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठाच्या वेब साईटवर प्रसिध्द केली जाणार आहे. यावर ज्या विद्यार्थ्यांचे काही आक्षेप असतील त्यांना १ जुलै ते ४ जुलै, २०१७ पर्यंत वेळ दिला जाणार आहे, त्यानंतर ६ जुलै ते १० जुल् पर्यंत संबंधीत विद्यार्थ्यांच्या ई-मेल आयडी वर त्या विद्यार्थ्यांचे हॉल तिकीट पाठवले जाणार आहेत व प्रत्यक्ष १४ व १५ जुलै, शुक्रवार व शनिवार, रोजी सर्व विद्या शाखेच्या विद्यार्थ्यांची पेट परिक्षा ९ ते ११, १२ ते २ व ३ ते ५ या वेळेत मराठवाडा विभागातील वेगवेगळया २० परिक्षा केंद्रावर घेतली जाणार आहे. यासाठी जिल्हा निहाय अधिष्ठातांची पेट समन्वयक म्हणून नेमणुक करण्यात आलेली आहे. परिक्षेच्या काळात कोणत्याही विद्यार्थ्यांला हॉल तिकीट, परिक्षा केंद्र, काही नावात बदल इतर काही अडचणी निर्माण झाल्यास त्यासाठी विद्यापीठाच्या व्यवस्थापन शास्त्र विभागात प्रा. डॉ. वाल्मिक सरवदे यांच्या मार्गदर्शनाखाली PET -2017 Facilitation cum counselling केंद्र स्थापन करण्यात आले आहे त्यासाठी विभागात सर्व सुविधा करण्यात आली आहे. या सर्व पेट -२०१७ या परिक्षेवर प्रभारी अधिकारी प्रा.डॉ. सतिश पाटील यांच्या नेतृत्वाखाली वाणिज्य व व्यवस्थापन शास्त्र शाखेचे अधिष्ठाता प्रा.डॉ. वाल्मिक सरवदे, कला व सामाजिक शास्त्र अधिष्ठाता प्रा. डॉ. दिलीप खैरनार, प्रा. डॉ. संजय सांळुके, अधिष्ठाता आंतर-विद्या शाखा, प्राचार्य डॉ. मजहर फारुकी, अधिष्ठाता, विज्ञान व अभियांत्रिकी शाखा व प्रा. डॉ. ई. आर. मार्टीन इत्यादी अधिकारी या प्रक्रियेमध्ये काम करत आहेत.

प्रा.डॉ. वाल्मिक सरवदे,
समन्वयक PET -2017